# महाराष्ट्र जीवन प्राधिकरण

४ था मजला, एक्सप्रेस टॉवर्स, नरीमन-पॉइंट, मुंबई-४०० ०२१
दूरध्वनी क्र. : २२०२६२४९, २२८३५२४७ फॅक्स : २२०२१३४८
ई.मेल पत्ता: mstmjp@rediffmail.com
cacmjp@rediffmail.com
वेब पत्ता : mahajeevan.com

जा.क्र.मजीप्रा/सस/तांशा.३/२३ | दिनांक :२२ ऑगस्ट, २००६

## परिपत्रक क्र.१२२

विषय :महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या आर्थिक परिस्थितीत सुधारणा.

प्रस्तावना :

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या आर्थिक परिस्थितीबाबत दिनांक : १३ ऑगस्ट, २००६ रोजी मा.मंत्री, पा.पु.व स्व. यांच्या अध्यक्षतेखाली व मा.राज्यमंत्री, पा.पु.व स्व. यांच्या उपस्थितीत झालेल्या मजीप्राच्या बैठकीमध्ये चर्चा झाली. सदरहू बैठकीमध्ये दोन्ही मंत्री महोदयांनी असे स्पष्ट आदेश दिले की, मजीप्राची आर्थिक परिस्थिती सुधारण्यासाठी सर्वप्रथम मजीप्राअंतर्गत सुधारणा राबविणे अत्यंत आवश्यक व तातडीचे आहे. त्यादृष्टीने मा.प्रधान सचिव, पा.पु.व स्व. विभाग यांच्याबरोबर, सदस्य सचिव (तां) व सर्व मुख्य अभियंत्यांची चर्चा झाली. प्रस्तुत चर्चेमध्ये, अंतर्गत सुधारणांचा पहिला टप्पा म्हणून मजीप्राच्या २५ पा.पु. केंद्रांबाबत तातडीने कार्यवाही करावी असे ठरले. उचित उपाययोजना तातडीने अंमलात आणून सदर २५ पा.पु.केंद्राद्वारे प्रभावी महसूल वसुली व वार्षिक खर्चात बचत साध्य होण्याच्या दृष्टीने पुढील निर्देश देण्यात येत आहेत.

१) विद्युत देयकांचा खर्च कमी करण्याच्या दृष्टीने तातडीने प्रयत्न करणे आवश्यक आहे. वाढीव पाण्याची गरज भागविण्यासाठी शक्य असेल तर जादा पंपींग करुन पाण्याची गरज भागवावी. मात्र हे शक्य नसेल तर अतिरिक्त पंपाचा वापर महावितरण कंपनीशी चर्चा करुनच करावा. अन्यथा या कारणामुळे दंडनीय देयक अदा करावे लागल्यास त्यास संबंधितांना जबाबदार धरले जाईल. त्यादृष्टीने संबंधित कार्यकारी (स्था/यां) यांनी त्वरित कार्यवाही करावी. (वीज खर्चातील बचतीबाबत स्वतंत्र परिपत्रक निर्गमित करण्यात येत आहे)

२) पाणी पुरवठाकेंद्राबाबत मुख्य अभियंता / अधीक्षक अभियंता या नियंत्रक अधिका-यांनी महसूल वसुलीबाबत निश्चित उद्दीष्ठ ठरवून त्याच्या पूर्ततेसाठी सर्वतोपरी प्रयत्न करावेत.

३) वरील २ प्रमाणे उद्दीष्ट ठरविले असले तरी कोणत्याही परिस्थितीत पाणी पुरवठयाच्या चालू देयकांची वसुली १००% झाली पाहिजे याबाबत नियंत्रण अधिका-यांनी कटाक्षाने दक्ष रहावे.

४) शक्यतोवर सार्वजनिक नळ (Stand post) बंद करावेत. तसे करणे शक्य नसल्यास, Stand-post सामाईक नळजोडणीमध्ये तातडीने रुपांतरित करुन त्यायोगे महसूल वसुलीत वाढ होईल असे पहावे.

५) सदरहू २५ पा.पु.केंद्रांबाबत unaccounted water चे प्रमाण अत्यंत कमी राहील यादृष्टीने कार्यवाही करावी. विशेषत्वाने, गळती दुरुस्तीच्या (leakages rectification) कामात कोणतीही दिरंगाई करु नये. याच अनुषंगाने दुसरी महत्वपूर्ण बाब म्हणजे अनधिकृत नळजोडण्या विशेष मोहीम राबवून शोधून काढाव्यात. व सदर जोडण्या अधिकृत/खंडित करण्याची कारवाई करण्यात यावी.

६) सहा नगरपालिकांना मजीप्राकडून ठोक तत्वावर पाणी पुरवठा केला जातो. त्यापैकी हिंगोली व खामगांव या दोन्ही नगरपालिकांकडून पाणी पुरवठयाच्या देयकांची थकबाकी मजीप्राला अदा करण्याबाबत प्रतिसाद मिळत नाही. त्यामुळे या नगरपालिकांसंदर्भात टप्प्या-टप्प्याने आवश्यक कार्यवाही करण्यात यावी. म्हणजेच आधी थकबाकी वसुलीसाठी नोटीस पाठविण्यात यावी. तद्नंतर मुख्याधिका-यांबरोबर बैठकी आयोजित करण्यात याव्यात. आणि अंतिमतः, आवश्यकता भासल्यास, पाणी कपात टप्प्या-टप्प्याने करण्यात यावी व त्यानंतरही सुधारणा न झाल्यास पाणी पुरवठा बंद करण्याची कारवाई करण्यात यावी. अशीच कारवाई ज्या नगरपालिका थकबाकी भरत नाहीत त्यांच्या बाबतही करावी

७) वॉटर ऑडीटसाठी विहीत पध्दतीत व विहीत तक्ते एन.आर.टी.सी., नाशिक यांनी तयार करावेत व सदस्य सचिव (तां) म.जी.प्रा. यांच्याकडे सादर करावेत. तद्नंतर सदर कार्यवाहीबाबत संबंधित अधीक्षक अभियंता यांना कळविण्यात येईल. अधीक्षक अभियंता, सं. व प्र.केंद्र, नाशिक यांनी अधीक्षक अभियंता (यां) यांच्या सहकार्याने वॉटर ऑडीट /एनर्जी ऑडीट संदर्भातील बेंचमार्कची निश्चिती करावी व संबंधित अधीक्षक अभियंता (स्था/यां)यांना तसे कळवावे. तद्नंतर संबंधित अधीक्षक अभियंता यांनी त्यांच्या कार्यक्षेत्रातील पा.पु. केंद्राबाबत वॉटर ऑडीटची /एनर्जी ऑडीटची कार्यवाही सप्टेंबर, २००७ अखेर पूर्ण करावी. या संपूर्ण कार्यवाहीचे नियंत्रण करण्यासाठी अधीक्षक अभियंता, सं.व प्र.केंद्र, नाशिक यांनी उचित कार्यवाही करावी.

८) सर्व साधारणत: जुलै ते जानेवारी या कालावधीमध्ये काही पाणी पुरवठा केंद्राच्या बाबतीत नागरिक मजीप्राच्या योजनांमधून पाणी पुरवठा घेत नाहीत अशा वेळेस या योजना अशा कालावधीत प्रस्तुत योजना बंद ठेवाव्यात जेणेकरुन विद्युत देयके व अशुध्द पाण्याची देयके यावरील खर्च कमी होईल. मात्र या कालावधीत अशुध्द पाण्याची आकारणी जलसंपदा विभागाने करु नये, तसेच वीज बिलाची आकारणी करु नये, याबाबतचा प्रस्ताव संबंधित मुख्य अभियंता यांनी शासनास वेळीच सादर करुन मंजुरी घ्यावी.

९) प्रस्तुत पाणी पुरवठा केंद्राबाबत वार्षिक देखभाल व दुरुस्तीच्या दृष्टीने सर्वसाधारण स्वरुपाची रु.२ लक्ष खर्चापर्यंतची स्थापत्य व यांत्रिकी कामे मंजूर करुन पूर्ण करण्याची कार्यवाही मजीप्राच्या प्रचलित पध्दतीनुसार मुख्य अभियंता स्तरावर करावी. तथापि, रु.२ लक्ष पेक्षा जास्त तसेच कोणत्याही मोठया स्वरुपाच्या दुरुस्तीची कामे (Major repairs) सदस्य सचिव (तां) यांच्या अनुमतीशिवाय करु नयेत. त्याचप्रमाणे पाणी पुरवठा केंद्राच्या ठिकाणी रस्ते करणे, रंग देणे, दरवाजे-खिडक्या बदलणे, इ. प्रकारची विशेष दुरुस्तीची कामे (special repairs) सुध्दा सदस्य सचिव (तां) यांची मान्यता घेऊनच करण्यात यावीत.

वरील सर्व मुद्यांच्या कार्यवाहीला प्रादेशिक नियंत्रण अधिकारी म्हणून मुख्य अभियंता पूर्णपणे जबाबदार असतील. परिपत्रकाच्या अंमलबजावणीच्या दृष्टीने केलेल्या कार्यवाहीचा तपशील ५ दिवसात या कार्यालयास सादर करावा.

सहपत्र : काही नाही.

संजय दहासहस्त्र

( संजय दहासहस्त्र )

सदस्य सचिव (तां)

प्रत :

मा.प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई यांना माहितीसाठी सादर.

सर्व मुख्य अभियंता, यांना माहिती व कार्यवाहीसाठी.

वि.स.मु.ले.अ., मजीप्रा, नवी मुंबई यांना माहिती व कार्यवाहीसाठी.

अधीक्षक अभियंता, मनिसंसं कक्ष, ठाणे यांना माहिती व कार्यवाहीसाठी

सर्व अधीक्षक अभियंता, मजीप्रा.मंडळ, यांना माहिती व कार्यवाहीसाठी

मुख्य प्रशासकीय अधिकारी, मजीप्रा, मुंबई यांना माहिती व कार्यवाहीसाठी

सर्व कार्यकारी अभियंता, म.जी.प्रा.बां.वि. यांना माहिती व कार्यवाहीसाठी

Swati/papukendra